वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं. -४०१ ३०५
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स -0250-2525107
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- ५५५ | विभाग :- मालमत्ता कर
दिनांक :-१४/०७/२०२१

**प्रस्तावाचा विषय:-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्ता धारकांना इलेक्ट्रीक वाहनांकरीता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थांतील नागरिकांना/गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या मालमत्ता करातून सूट किंवा परतावा देण्याबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर:-** भारतात दिवसेंदिवस वाहनांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे या वाहनांना चालविण्यासाठी इंधन शक्तीचा वापर खुप मोठ्याप्रमाणात होत आहे. स्वाभाविक इंधनच्या अतिवापरामुळे या नैसर्गिक स्त्रोताचा नाश होत आहे व त्यापासून निघणाऱ्या धुरामुळे दिवसेंदिवस प्रदुषण वाढत आहे व वाढत्या प्रदुषणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. संदर्भिय शासननिर्णय विचारात घेवून विद्युत शक्तीवर चालणाऱ्या वाहनांचा वापर केल्यास हवा प्रदुषण होणार नाही त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण होईल.

इलेक्ट्रीक वाहनांचा वापर हा शाश्वत विकास ध्येयाच्या (Sustainable Development Goals) अंतर्गत (१) किफायतशीर व स्वच्छ ऊर्जा (Affordable and Clean Energy), (२) संसाधनाचा सुयोग वापर आणि निर्मिती (Responsible Consumption and Production) आणि (३) वातावरणीय बदलांना अनुरूप कृती (Climates Action) यांची उद्दीष्टये साध्य करण्याकरिता एक महत्तवाचा घटक आहे. इलेक्ट्रीक वाहनांकरिता महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण-२०२१ मधील तरतूदीनुसार इलेक्ट्रीक वाहनांकरिता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थांनातील नागरिकांना/गृहनिर्माण संस्थाना त्यांच्या मालमत्ता करात सूट देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती त्यानुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडून पारित करण्यात आलेला शासन निर्णय खालीलप्रमाणे

शासन निर्णय क्रमांक:एमयुएस-२०२१/प्र.क्र.१३४/नवि-१७ नुसार इलेक्ट्रीक वाहनांकरिता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थांनातील नागरिकांना/गृहनिर्माण संस्थाना महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२१ लागू असेपर्यंत:-

(१) स्वत:च्या इलेक्ट्रीक वाहनाकरिता चार्जिंग स्टेशन उभारल्यास व त्यातून इतर इलेक्ट्रीक वाहनधारकांना चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास, मालमत्ता करात २% सूट देण्यात यावी. तथापि, रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता मालमत्ता धारकांने घ्यावी.

(२) गृहनिर्माण संस्थांमध्ये सामायिक सुविधांतर्गत सदस्यांना इलेक्ट्रीक वाहन चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास मालमत्ता करात ५% इतक्या कमाल मर्यादेपर्यंत सूट देण्यात यावी.

वसई-विरार शहर महानगरपालिका महानगरपालिका सचिव

(३) गृहनिर्माण संस्थांनी त्यांच्या मालकीच्या जागेत व्यापारी तत्वावर इलेक्ट्रीक वाहन चार्जिंगची सुविधा, मुळ पार्किंग वगळता अन्य मोकळया जागेत केल्यास, मात्र त्यामुळे आपत्कालीन कामाकरीता ती जागा अडचणीची असू नये. सदर मोकळ्या जागेचा वापर व्यापार कारण्याकरिता होणारा असला, तरी त्या जागेकरीता व्यापारी दराने मालमत्ता कराची आकारणी न करता, ती घरगुती दराने करावी.

वरील शासननिर्णयानुसार शासनाने इलेक्ट्रीक वाहन धोरण-२०२१ निहीत केलेले आहे. सदर धोरणाचा हेतूच मुळात नैसर्गिक स्त्रोताची बचत पर्यावरणाचे रक्षण असा आहे. सदरची बाब भारतीय राज्यघटनेतील (कलम ४८ए) मध्ये पर्यावरण सुधारणे व त्याचे संरक्षण करणे आणि वने व वन्यजीव यांचे संरक्षण करणे असे नमूद आहे. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण करावे हे आपले आद्य कर्तव्य आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४० ब अन्वये परिस्थितीकीय दृष्टया लाभदायक योजनची अमंलबजावणी करण्याकरिता मालमत्ता करात सूट किंवा परतावा देण्याची तरतूद आहे. या कलमाच्या प्रयोजनार्थ "परिस्थितीकीयदृष्टया लाभदायक योजना" या शब्दप्रयोगात पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौर ऊर्जेचा वापर आणि इतर अपारंपारिक ऊर्जास्त्रोत, सांडपाण्याचे पुनश्चकरण आणि पुनर्वापर किंवा पर्यावरणानुकूल आणि परिस्थितकीय लाभदायक गृहनिर्माण यांना चालना देणारी किंवा महानगरपालिका किंवा राज्य शासन यांनी निश्चित केलेली यासारखी कोणतीही योजना, या गोष्टींचा समावेश होतो.

तरी उपरोक्त सर्व बाबीचा विचार होऊन महानगरपालिकेच्या हद्दीत इलेक्ट्रीक वाहनांकरीता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थांतील नागरिकांना/गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या मालमत्ता करातून सूट किंवा परतावा देण्याबाबत मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

<u>निर्णय:-</u> शासन निर्णय क्रमांक:एमयुएस-२०२१/प्र.क्र.१३४/नवि-१७ नुसार इलेक्ट्रीक वाहनांकरिता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थांनातील नागरिकांना/गृहनिर्माण संस्थाना महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२१ लागू असेपर्यंत:-

(१) स्वत:च्या इलेक्ट्रीक वाहनाकरिता चार्जिंग स्टेशन उभारल्यास व त्यातून इतर इलेक्ट्रीक वाहनधारकांना चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास, मालमत्ता करात २% सूट देण्यात यावी. तथापि, रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता मालमत्ता धारकांने घ्यावी.

(२) गृहनिर्माण संस्थांमध्ये सामायिक सुविधांतर्गत सदस्यांना इलेक्ट्रीक वाहन चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास मालमत्ता करात ५% इतक्या कमाल मर्यादेपर्यंत सूट देण्यात यावी.

(३) गृहनिर्माण संस्थांनी त्यांच्या मालकीच्या जागेत व्यापारी तत्वावर इलेक्ट्रीक वाहन चार्जिंगची सुविधा, मुळ पार्किंग वगळता अन्य मोकळया जागेत केल्यास, मात्र

वसई-विरार शहर महानगरपालिका
महानगरपालिका सचिव

त्यामुळे आपत्कालीन कामाकरीता ती जागा अडचणीची असू नये. सदर मोकळ्या जागेचा वापर व्यापार कारण्याकरिता होणारा असला, तरी त्या जागेकरीता व्यापारी दराने मालमत्ता कराची आकारणी न करता, ती घरगुती दराने करावी.

वरिल बाबींची अर्हता पूर्ण करणाऱ्या मालमत्ता धारकांना सन २०२१-२२ या वित्तीयवर्षापासुन इलेक्ट्रीक वाहनांकरीता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थांतील नागरिकांना/गृहनिर्माण संस्थांना अनुदान अदा करणेस प्रशासकीय मंजुरी देणेत येत आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका
महानगरपालिका सचिव

सत्य प्रत

महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका